**महाराष्ट्र शासन**

तात्काळ

**Email** id - ravindra.sawant84@nic.in
फोन नं.०२२-२२०२६४८८

क्र.-संकिर्ण-०४/२०१६/प्र.क्र.५५/अ-२
महसूल व वन विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक:- २७ एप्रिल, २०१७

प्रति,

सर्व विभागीय आयुक्त

सर्व जिल्हाधिकारी

विषय : राष्ट्रीय महामार्ग अधिनियम, १९५६ नुसार संपादित होणा-या जमिनींबाबत RFCTLARR, २०१३ च्या कायद्यातील कलम ९६ नुसार आयकरातून सूट देणेबाबत.

संदर्भ.: १) जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांचे पत्र क्र.LAQ/NH६६/TDS/०५/२०१६,दि.११.१.२०१७
२) केंद्र शासनाच्या वित्त विभागाचे Circular No.३६/२०१६, दि.२५.१०.२०१६.

महोदय,

उपरोक्त विषयावरील संदर्भाधीन पत्राच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, RFCTLARR, २०१३ च्या कायद्यातील अनुसूची १ (जमीन मालकांसाठी नुकसान भरपाई), अनुसूची २ (पुनर्वसन व पुनर्वसाहत हक्कदारींचे घटक) व अनुसूची ३ (पायाभूत सुखसुविधांसाठी तरतूद) येथील तरतूदी राष्ट्रीय महामार्ग कायद्यातील लाभधारकांना दि.२५.८.२०१५ च्या आदेशानुसार लागू करण्यात आलेल्या असल्याने त्यांना RFCTLARR, २०१३ च्या कायद्यातील कलम ९६ येथील आयकराबाबतच्या तरतूदीचा फायदा देता येईल किंवा कसे याबाबत विधी व न्याय विभागाकडे मार्गदर्शनार्थ विचारणा करण्यात आली होती.

त्यानुषंगाने विधी व न्याय विभागाने खालीलप्रमाणे अभिप्राय दिलेले आहेत :-

*"Considering the clarification given by the Ministry of Finance, Government of India vide circular dated 25.10.2016 it is manifestly clear that the beneficiaries who have received compensation as per provisions of the Act, 2013 towards acquisition of their land under National High ways Act,1956 are entitled to exemption from payment of TDS deductable u/s 194LA of Income Tax Act,1961, as provided under section 96 of the RFCTLARR Act,2013."*

२. उक्त नमूद विधी व न्याय विभागाचे अभिप्राय लक्षात घेता, राष्ट्रीय महामार्ग अधिनियम, १९५६ नुसार संपादित होणा-या जमिनीचा मोबदला लाभधारकांना भूसंपादन अधिनियम, २०१३ च्या तरतूदीनुसार देय ठरत असल्यामुळे ते भूसपादन अधिनियम, २०१३ मधील कलम-९६ च्या तरतूदीप्रमाणे आयकर अधिनियम, १९६१ मधील कलम-१९४LA प्रमाणे आयकर कपातीपासून सूट मिळण्यास पात्र ठरतात. सदर बाब आपल्या अधिपत्याखालील सर्व संबंधित अधिकारी/ कर्मचारी यांच्या निदर्शनास आणावी व त्यानुसार पुढील आवश्यक कार्यवाही तातडीने करावी अशी आपणास विनंती आहे.

३. सदर पत्र विधी व न्याय विभागाच्या सल्ल्यानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

आपला,

(राजेंद्र ना. पिंपळे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
२) प्रादेशिक अधिकारी, राष्ट्रिय महामार्ग प्राधिकरण, मुंबई / नागपूर

129/sawant/letter/a-2/2017

Scanned by CamScanner